



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २६६
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, गुरुवार, दि.०८ मे २०२५


## थोडक्यात

### विंचूरला वादळीवाऱ्यासह अवकाळी पाऊस मोठ्या प्रमाणावर झाले नुकसान....



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.७, विंचूर (नाशिक) :** विंचूर –निफाड तालुक्यातील विंचूर आणि परिसरात दुपारी ४ वाजेच्या सुमारास अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. आगंतुकपणे पाऊस आल्याने खळ्यावरील व शेतामधील पिके झाकतांना शेतकऱ्यांची फारच तारांबळ उडाली. सकाळपासून वातावरण झाकळलेले होते. अचानकपणे ढगांची जमवाजमव होऊन, पावसाचे वातावरण निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात वादळ वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. पावसाने जोरदार बॅटिंग केली आणि रात्रभर तुरळत पाऊस चालू होता. ऐन उन्हाळ्यात कोसळलेल्या अवकाळी पावसामुळे नागरिकांची पुरती धांदळ उडाली. विंचूरला कृषी उत्पन्न बाजार समितीत साधारण सात ते आठ कांदा व धान्य व्यापाऱ्यांची शेड जमीनदोस्त झाले. कांदा शेड पडल्याने व्यापाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेडमध्ये साठवलेला कांदा पूर्ण खराब झाला. तर काही शेड जमीन दोस्त झाल्यामुळे व्यापारी वर्गात आर्थिक संकट निर्माण झाले आहे. तसेच या अवकाळी पावसाच्या आगमनाने शेतकरी वर्गाचेही मोठे नुकसान झाले आहे.

### नागपूरच्या मेयो वैद्यकीय महाविद्यालयात जेवणात अळ्या




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, नागपूर :** इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय (मेयो) येथील एमबीबीएस विद्यार्थ्यांच्या जेवणात अळ्या आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. संबंधित प्रकार समोर आल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली आहे. संबंधित मेस चालकाला तातडीने नोटीस बजावण्यात आली असून, केटरिंग सेवा तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. ही घटना महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतिगृहातील मेसमध्ये घडली. एका विद्यार्थिनीच्या भाजीमध्ये अळी आढळून आल्याने ही बाब समोर आली. विद्यार्थ्यांनी तत्काळ वॉर्डनकडे तक्रार केली. मात्र समाधानकारक उपाययोजना न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नाराज विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर फोटो आणि व्हिडिओ शेअर करत प्रशासनाकडून उत्तर मागितले.

प्रशासनाने तातडीने लक्ष घालत मेस चालकाला नोटीस बजावली आहे. प्रशासनाकडून अन्न नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आले आहेत. अधिष्ठाता डॉ. रवी चव्हाण आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन शेंडे यांनी स्पष्ट केले की, विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही. दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच, नवीन पुरवठादार शोधण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या घटनेनंतर आरोग्य खात्याच्या अन्न सुरक्षा विभागानेही मेसची तपासणी केली आहे. स्वयंपाकघरात स्वच्छतेच्या निकषांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले आहे. यासंदर्भातील अहवाल काही दिवसांत सादर होणार आहे. या अहवालानंतर कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.

**मेयो वसतिगृहात शुद्ध पाणीही उपलब्ध नसल्याच्या तक्रारी**

प्रियदर्शी संग्राम अशोक बहुउद्देशीय संस्थेने देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देत या प्रकारात हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. संस्थेचे अध्यक्ष अनिकेत कुत्तरमारे यांनी सांगितले की, मेयो वसतिगृहात शुद्ध पाणीही उपलब्ध नसल्याच्या तक्रारी आहेत. मात्र प्रशासन याकडे दुर्लक्ष करत आहे. या प्रकारामुळे महाविद्यालय प्रशासनाची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी जेवणाच्या गुणवत्तेबाबत पूर्वीही तक्रारी केल्या असल्याचे समोर आले आहे. यापुढील काळात पारदर्शकता राखत मेस व्यवस्थापनावर नियमित देखरेख ठेवण्याची गरज असल्याची मागणी विद्यार्थी वर्गातून होत आहे.

# पाकमध्ये घुसून ऑपरेशन सिंदूर ! अन असा घेतला बदला..

**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि .०७, नवी दिल्ली :**
पाकिस्तानने स्वप्नातही कल्पना केली नसेल की, भारत या पद्धतीने प्रत्युत्तर देईल. पहलगाम हल्ल्यानंतर पेटून उठलेल्या भारताने, युद्ध परिस्थितीला तोंड देण्यासाठी आज ७ मे रोजी देशभरात मॉक ड्रिल केले जाईल, अशी माहिती आधीच दिली होती. म्हणजेच, युद्धाच्या परिस्थितीत काय करायचे याचा सराव करण्यासाठी देशभरातील निवडक ठिकाणी युद्धाचे सायरन वाजवले जातील.

**शाहबाज आणि मुनीर भारताच्या सायरनची वाट पाहत राहिले...**

पाकिस्तानचे पंतप्रधानशाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख असीम मुनीर फक्त धमक्या देत राहिले. नवी दिल्ली ते पाटणा पर्यंत भारतात कोणत्या प्रकारची मॉकड्रिल होईल, सायरन कसे वाजतील आणि शेवटी काय होईल याची दोघेही वाट पाहत राहिले. पण भारत अचानकपणे असे काही करेल याची त्यांनी कल्पनाही केली नव्हती.

**भारताचे पाकिस्तानला त्याच्याच भाषेत उत्तर**

खरं तर, पाकिस्तान सुरुवातीपासूनच प्रॉक्सी युद्धे लढण्यात पटाईत आहे. तो नेहमीच भारताला वाटाघाटीच्या टेबलावर आणत असे आणि पूंछ, उरी आणि कारगिलसारखे मागून हल्ले करत असे. पण यावेळी डाव उलटला. भारताने मॉक ड्रिलची घोषणा करून पाकिस्तानला गोंधळात टाकले.

**भारताने पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला...**

याचा परिणाम असा झाला की पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख आसिफ मुनीर भारतात सायरन वाजण्याची वाट पाहत राहिले. पण खरी धोक्याची घंटा पाकिस्तानात तेव्हा वाजली जेव्हाभारतीय सैन्यानेक्षेपणास्त्र आणि हवाई हल्ल्यांद्वारे पाकिस्तान आणि पीओकेमधील ९ दहशतवादी अड्डे उद्ध्वस्त केले.

**आता पाकिस्तान काय करेल?**

भारताच्या या कारवाईनंतर पाकिस्तानची झोप उडाली आहे. आता पाकिस्तान असे म्हणू शकत नाही की, भारताने त्याच्याविरुद्ध युद्ध पुकारले आहे.




कारण भारतीय सैन्याने फक्त त्या ठिकाणांना लक्ष्य केले आहे जिथे दहशतवाद्यांनी त्यांचे अड्डे बनवले होते. भारतीय सैन्याने हे देखील दाखवून दिले की कोणतीही परकीय शक्ती त्यांना त्यांच्या निष्पाप नागरिकांच्या रक्ताचा बदला घेण्यापासून रोखू शकत नाही.

**भारतीय सैन्यानं जमीनदोस्त केलेले दहशतवादी तळ नेमके कुठे?**

१. **बहावलपूर–** आंतरराष्ट्रीय सीमेपासून जवळपास १०० किलोमीटर दूरवर आहे. इथेच जैश–ए–मोहम्मदचं मुख्यालय होतं. हे मुख्यालय भारतीय सैन्यानं जमीनदोस्त केलं होतं.

२. **मुरीदके–** हा दहशतवादी तळ आंतरराष्ट्रीय सीमेपासून ३० किमी दूर आहे. लष्कर–ए–तैयबाची शिबिरं इथे व्हायची. या तळाचा संबंध मुंबईवरील २६/११ हल्ल्याशी आहे.

३. **गुलपूर–** हा दहशतवादी तळ एलओसी (पुंछ–राजौरी) पासून ३५ किलोमीटर दूर आहे.

४. **लष्कर कॅम्प सवाई–** हा दहशतवादी तळ पीओके तंगधार सेक्टरच्या आतमध्ये ३० किलोमीटर दूर आहे.

५. **बिलाल कॅम्प–** जैश–ए–मोहम्मदचं लॉन्चपॅड, दहशतवाद्यांना सीमेपलीकडे पाठवण्यासाठी या तळाचा वापर व्हायचा.

६. **कोटली–** एलओसीपासून १५ किमी दूरवर लष्कराचं शिबिर, ५० पेक्षा अधिक दहशतवाद्यांची क्षमता असलेला तळ

७. **बर्नाला कॅम्प–** हा दहशतवादी तळ एलओसीपासून १० किमी दूर होता.

८. **सरजाल कॅम्प–** सांबा–कठुआच्या समोर आंतरराष्ट्रीय सीमेपासून ८ किमी दूर असलेलं जैशचं प्रशिक्षण केंद्र.

९. **मेहमूना कॅम्प (सियालकोटजवळ)–** या ठिकाणी हिज्बुल मुजाहिद्दीनचं प्रशिक्षण शिबिर होतं. हा तळ आंतरराष्ट्रीय सीमेपासून १५ किमी दूर होता.

भारताच्या एअर स्ट्राईकनंतर संरक्षण मंत्रालयाकडून माध्यमांना निवेदनातून कारवाईची माहिती देण्यात आली. 'काही वेळापूर्वी भारतीय सशस्त्र दलांनी ऑपरेशन सिंदूरची सुरुवात केली. त्यात पाकिस्तान आणि पीओकेमधील दहशतवादी तळांना लक्ष्य करण्यात आलं, जिथून भारताविरोधात दहशतवादी हल्ल्यांची योजना तयार केली होती आणि त्याची अंमलबजावणी करण्यात आली होती. एकूण ९ तळांना लक्ष्य करण्यात आलं. आमच्याकडून पाकिस्तानच्या कोणत्याही लष्करी इमारतीला किंवा ठिकाणाला लक्ष्य करण्यात आलेलं नाही. भारतानं लक्ष्य निवडताना संयम बाळगला,' अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली.

# छगन भुजबळ आणि महात्मा फुले समता परिषदेच्या पाठपुराव्याला यश – सुभाष लोंढे

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, अहिल्यानगर :** ओबीसी राजकीय आरक्षणासंदर्भात मा. उपमुख्यमंत्री ओ बी सी नेते छगनरावजी भुजबळ आणि महात्मा फुले समता परिषदेच्या पाठपुराव्याला मोठे यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसी समाजाला सन २०२२ पूर्वी लागू असलेले २७ टक्के राजकीय आरक्षण पूर्ववत करण्याचे आणि राज्यात पुढील ४ महिन्यांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. याबद्दल समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे स्वागत केले असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री मा.छगनरावजी भुजबळ साहेब, ज्यांच्या माध्यमातून हा पाठपुरावा सुरू होता असे मा. खा. समीरभाऊ भुजबळ यांच्यासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या



निर्णयाचे राज्यभरातील ओबीसी समाजाने स्वागत केले असून अहिल्यानगर समता परिषदेच्या वतीने न्यायालयाच्या या निर्णयाचे पेढे वाटून स्वागत केले आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. याला आज मोठे यश मिळाले असून सुप्रीम कोर्टासह देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांचे विशेष सहकार्य लाभलेले आहे. राज्यात सन २०२२ नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नेमण्यात आलेल्या बांठिया कमिशनने योग्यरित्या अहवाल गोळा न केल्याने ओबीसींचे राजकीय आरक्षण धोक्यात आले होते. या विरोधात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने सुप्रीम कोर्टात ओबीसींचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी याचिका दाखल करण्यात आली होती. याबाबत मा. खा. समीरभाऊ भुजबळ हे स्वतः विशेष लक्ष देऊन सुप्रीम कोर्टात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने विशेष प्रयत्न करत होते. याचिकेच्या सुनावणीदरम्यान मा. खा. समीरभाऊ भुजबळ, मा. सनदी अधिकारी महेश झगडे, ॲड. मंगेश ससाणे हे ज्येष्ठ वकिलांसह दिल्लीत उपस्थित होते. त्यांनी सर्वांशी चर्चा करून आपली भूमिका मांडली. या लढ्याला यश प्राप्त झाले असून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत निर्णय देताना सुप्रीम कोर्टाने सन २०२२ च्या पूर्वी असलेले ओबीसींचे २७ टक्के राजकीय आरक्षण कायम ठेऊन निवडणुका घेण्याचा महत्वपूर्ण निर्णय दिला आहे. ओबीसी, भटक्या विमुक्त समाजाच्या राजकीय अस्तित्वासाठी हा अतिशय महत्वपूर्ण निर्णय आहे. गेल्या आठवडाभरात ओबीसींच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे दोन निर्णय झाले असल्याने ओबीसी समाजात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. केंद्र सरकारने घेतलेला जातनिहाय जनगणनेचा निर्णय, तसेच सुप्रीम कोर्टाने दिलेला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील निर्णय हे ओबीसींच्या अस्तित्वासाठी अतिशय महत्वाचे आहेत. असे प्रतिपादन महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे यांनी व्यक्त केले आहे.

सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाचे स्वागत करत अहिल्यानगर जिल्हा महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष सुभाष लोंढे, प्रदेश उपाध्यक्ष अंबादास गारुडकर, शहर जिल्हाध्यक्ष दत्ता जाधव, प्रदेश सरचिटणीस अनिल निकम, प्रदेश प्रवक्ते मुकुंद सोनटक्के, नागेश गवळी, बबनराव घुमटकर, वसंत रांधवण, अनिल गाडिलकर श्याम जाधव आदी समता सैनिकांनी आनंद उत्सव साजरा केला.

# डहाणू तालुक्यात अवकाळी पावसाचा तडाखा; शेती, घरं आणि वीज पुरवठ्याचे मोठे नुकसान

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०७, डहाणू (पालघर) :** डहाणू तालुक्यात बुधवारी संध्याकाळी सातच्या सुमारास अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावली. जोरदार वादळी वारे, विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून ढगाळ वातावरण होतेच, परंतु बुधवारी संध्याकाळपासून सुरू झालेल्या पावसाने रात्रीभर थैमान घातले.

**वीटभट्टी व्यावसायिक आणि मजुरांचे हाल**

अचानक सुरू झालेल्या पावसामुळे डहाणूतील वीटभट्ट्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. वीट सुकवण्यासाठी तयार करून ठेवलेल्या वीटा भिजल्यामुळे व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान झाले आहे. शिवाय,




भट्ट्यांवर राहणाऱ्या मजुरांच्या झोपड्याही उडाल्या असून त्यांना उघड्यावर रात्र काढावी लागली. अनेकांच्या संसार उपयोगी वस्तूंना पावसाने फटका दिला आहे.

**घरकुलांची पडझड; नागरिक उघड्यावर**

ग्रामीण भागात घरकुलं मोठ्या प्रमाणावर असल्याने वादळी वार्याने अनेक घरांचे छप्पर उडाले, सिमेंटचे पत्रे फुटले. घरावरील पत्रे उडाल्याने घरातील वस्तू भिजून खराब झाल्या असून नागरिकांची तारांबळ उडाली आहे. अनेक कुटुंबांनी उघड्यावर रात्र काढावी लागली.

**वीज पुरवठा खंडित; नागरिक अंधारात**

बुधवारी संध्याकाळी वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी विजेच्या तारांवर झाडं कोसळली, त्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला. बुधवारी रात्रीपासून गुरुवारी संध्याकाळपर्यंत संपूर्ण तालुक्यात अंधार होता. गुरुवारची रात्रही नागरिकांना अंधारात काढावी लागणार आहे.

**उन्हाळी भात पीक उद्ध्वस्त; शेतकऱ्यांवर संकट**

सूर्या प्रकल्पाच्या कालव्यांवर आधारित डहाणूतील उन्हाळी भात शेतीला मोठा फटका बसला आहे. सध्या भात पीक कापणीसाठी तयार होते. अनेक शेतकऱ्यांनी कापलेला भात वाळवण्यासाठी शेतात ठेवला होता. परंतु वादळी वाऱ्यामुळे उभे पीक आडवे झाले असून कापलेला भातही भिजून गेलेला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांकडून तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी केली जात आहे.

**हवामान खात्याचा इशारा**

हवामान खात्याच्या माहितीनुसार बुधवारी सायंकाळी ५० ते ५५ किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहत होते. पुढील दोन दिवसांतही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# संपादकीय

## घर में घुस के मारा....

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात २६ निष्पाप पर्यटकांचा मृत्यू झाला या भ्याड हल्ल्यानंतर संपूर्ण भारतात संतापाची लाट उसळली. दहशतवाद्यांनी केलेला हा भ्याड हल्ला पर्यटकांवर नव्हता तर भारताच्या सार्वभौमत्वावर होता त्यामुळे भारत पाकिस्तानच्या या भ्याड हल्ल्यास कधी चोख प्रतिउत्तर देणार ? असा प्रश्न विचारला जात होता. याचे उत्तर बुधवारी मिळाले. बुधवार ७ मे रोजी मध्यरात्री १ वाजून २८ मिनिटांनी भारतीय वायू दलाने पाकव्याप्त काश्मीरवर हवाई हल्ले केले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात पाकव्याप्त काश्मीरमधील नऊ दहशतवादी तळावर हल्ले करून दहशतवाद्यांचे कंबरडे मोडले. भारतीय हवाई दलाने केलेल्या या हल्ल्यात शेकडो दहशतवादी ठार झाले आहेत. भारताने केलेल्या या हल्ल्यात किती दहशतवादी ठार झाले याचा आकडा समोर आला नसला तरी या हल्ल्यात १०० पेक्षा अधिक दहशतवादी ठार झाल्याची शक्यता असून यात लष्कर ए तोयबा आणि जैश ए मोहम्मदचे अनेक मोठे दहशतवादी ठार झाले आहेत. भारतीय हवाई दलाने जवळपास २३ मिनिटे हल्ले केले. भारताने केलेल्या हवाई हल्ल्याला ऑपरेशन सिन्दुर असे नाव देण्यात आले. पहलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्यात ज्या भारतीय महिलांचे कुंकू ( सिन्दुर ) पुसले गेले त्या महिलांच्या सन्मानार्थ या मोहिमेला लष्कराने ऑपरेशन सिन्दुर असे नाव दिले. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला जशास तसे उत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १५० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १५० कोटी भारतीय भारतीय सैन्यदलापुढे नतमस्तक आहे. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल असा इशाराच भारताने जगाला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ॲक्शनला रीॲक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्यदलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतर देखील पाकिस्तानची खोड मोडली नाही पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. १९७१ साली भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे केले जर पाकिस्तानने आपली खोड मोडली नाही तर भविष्यात पाकिस्तानचे चार तुकडे होतील. भारताने पाकव्याप्त काश्मीरवर केलेल्या या हवाई हल्ल्याला पाकिस्तान कसे उत्तर देईल हे पाहावे लागेल. अर्थात या हवाई हल्ल्याला पाकिस्तानने प्रतिउत्तर दिले तर ती पाकिस्तानची सर्वात मोठी चूक ठरेल जर पाकिस्तानने तसे केले तर भारत - पाकिस्तान युद्धाला तोंडच फुटेल. भारत पाकिस्तान युद्धाला तोंड फुटले तर पाकिस्तान जगाच्या नकाशावरून गायब होऊ शकतो याचे भान पाकिस्तानने ठेवावे. पाकिस्तानने चीनच्या भरवश्यावर भारताशी दोन हात करू नयेत कारण आजचा भारत हा चीनलाही जशास तसे उत्तर देण्यास सक्षम आहे. चीननेही पाकिस्तानची बाजू लावून धरू नये कारण दहशतवादाविरुद्धच्या या युद्धात भारताला अनेक देशांची साथ आहे. अमेरिका, इस्राईल, जपान, रशिया या देशांनी आताच भारताला पूर्ण पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानला जरी तुर्कस्तान, मलेशिया आणि काही इस्लामिक राष्ट्रांनी पाठिंबा दिला असला तरी जगातील सर्व प्रमुख देश भारतच्या बाजूने आहे हे पाकिस्तानने विसरू नये. पाकिस्तानने जर पुन्हा भारताची कुरापत काढली तर त्याची शिक्षा पाकिस्तानला मिळेलच यात शंका नाही. ऑपरेशन सिन्दुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

# सावधान... पाणीबाणी...



अगदी उन्हाळा सुरू आहे, साहजिकच पाण्याने तळ गाठला आहे. भूगर्भातील पाण्याच्या पातळीत कमालीची घट दिसत आहे. पाणी हा नैसर्गिक स्त्रोत आहे आणि तो आपल्याला गंभीरपणाने घ्यायला पाहिजे याबाबत अजूनही जागरूकतेचा अभाव असल्याचे आपणाला दिसत आहे. जसा एखादा भिक्षुक आपल्या अस्तित्वाची लढाई लढत असतो त्याप्रमाणे तुम्हाआम्हाला पाणी पाहिजे, पाणी पाहिजे म्हणून भीक मागायची वेळ यायला कोण्या ज्योतिषाने सांगण्याची गरज नाही.

पाणी हेच जीवन हे आपणाला माहीत असताना सुद्धा आपण पाण्यासाठी लढाई का करत नाही? जलस्त्रोत जिवंत ठेवणे व त्यांच्या पुनर्भरणासाठी आपण का लढायला तयार होत नाही? याबाबत कमालीची अनास्था दिसून येते आहे आणि हीच खरी शोकांतिका भूमातेच्या सुपूत्रांची आहे.आज आपल्या देशात युद्धजन्य परिस्थिती आहे. आपला पारंपारिक दुश्मन पाकड्याने नुकताच आपल्या पहेलगाम मध्ये निष्पाप बांधवांचा बळी घेतला. त्याला तोडीस तोड किंबहुना त्यापेक्षा अधिक पणाने उत्तर देण्यासाठी आपण सज्ज झालो आहोत,तत्पूर्वी सिंधू जलवाटप कराराला स्थगिती देणे, चिनाब नदीतून सीमेपलीकडे जाणारे पाणी रोखून पाकडयांच्या घशाला कोरड पाडण्याचा आपला प्रयत्न आहे, अर्थातच भारताने पाकिस्तानची पाणी कोंडी करून शक्तीनिशी सामना करण्याचा संकेत दिला आहे. थोडक्यात पाणी कोंडी हा सर्जिकल स्ट्राईक करून पाकिस्तानला भारताने मुख्य उद्दिष्ट बनवले आहे. पाणी हे जीवन आहे आणि तेच जर रोखले तर शत्रू नामोहरम लवकर होणार आहे. पाण्यामुळे होणाऱ्या नुकसानामुळे पाक हवालदिल आहे कारण पाण्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. तापमानात झालेल्या वाढीमुळे उन्हाच्या झळांनी जीव मेटाकुटीस येतो आहे. उष्माघाताच्या बळींची संख्या चिंतनाचा विषय ठरत असतानाच पाणीटंचाईची भीषण समस्यांचा सामना करावा लागतो आहे. पाण्याचा काळजीपूर्वक वापर, पाण्याचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन, जलस्त्रोतांचे जिवंतीकरण यावर फार गंभीरपणे चर्चा विशेषतः उन्हाळा आला की होती. माकडाची घर बांधायची काल्पनिक गोष्ट ही आपणाला ज्ञातच आहे,तसंच काहीसं होतंय ही वस्तुस्थिती आहे पण हे किती दिवस चालणार? पाणीटंचाईच्या समस्येवर मात कधी केली जाणार? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आपणाला पाण्यासाठी खूप मोठं ,जलद गतीने आणि ताकतीने काम करावे लागणार आहे. नाहीतर भविष्य धोक्यात आणि अंधकारमय आहे. पाण्याचा गैरवापर, पाण्याचा अनियंत्रित उपसा यांना आवर घालावा लागेल.गेल्या वर्षी पडलेल्या पुरेशा पावसामुळे या उन्हाळ्यात पाणीटंचाईची समस्या एवढी जाणवणार नाही असे वाटत होते पण तीच वेळ येऊन ठेपलेली आहे.दिवसेंदिवस तापमानात वाढ होत असल्यामुळे पाण्याचा जास्तीचा वापर होत आहे.फेब्रुवारी मार्च मध्येच नद्या ,तलाव ,धरणातील पाण्यात प्रचंड प्रमाणात घट झाली आहे. भूजल पातळी दीड ते तीन मीटर पर्यंत घटली आहे .महाराष्ट्रातील वेगवेगळ्या तालुक्यात वेगवेगळी परिस्थिती आहे. गेल्या काही वर्षांच्या तुलनेच्या मानाने चिंताजनक परिस्थिती आहे. दिवसेंदिवस धरणांची ,नद्यांची भूजल पातळी घटत आहे यामध्ये भीमा, तापी ,प्रवरा, गोदावरी या प्रमुख नद्यांचा समावेश आहे. इतर नद्यांचीही तीच परिस्थिती आहे परंतु सद्यस्थितीतही पाण्याचा बेसुमार वापर थांबायला तयार नाही, ही विदारक स्थिती आहे.भूजल टिकवून ठेवण्यासाठी विशेष प्रयत्नांची गरज आहे. वृक्षतोडीपेक्षा वृक्ष लागवडीच्या प्रमाणात फार मोठ्या प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे ,यामुळे जमिनीची धूप थांबणार आहे व जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढली जाणार आहे.यामुळे तापमानाच्या प्रमाणात घट होईल .निसर्गावर प्रेम करणाऱ्यांच्यात वाढ झाली तरच निसर्ग आपल्याला भरभरून देईल. निसर्गाकडून आपणाला नुसतच घेऊन चालणार नाही त्याला द्यावेही लागेल तरच आलेल्या परिस्थितीवर दिलासा मिळेल.

**- पत्रकार विकास दळवी**

## कुंडलवाडी पोलीसांनी अवैध वाळू वाहतुकीचा ट्रॅक्टर पकडला

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०७, कुंडलवाडी :** शहरापासून जवळच असलेल्या हुनगुंदा शिवारातील मांजरा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर दि.६ मे रोजी पहाटे ५:३० वाजता कुंडलवाडी पोलिसांनी पकडले असून ट्रॅक्टर चालक व ट्रॅक्टर मालकाविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी दिली आहे. कुंडलवाडी शहरापासून जवळच असलेल्या मांजरा नदी पात्रातून शासनाची कोणतीही परवानगी नसताना बेकायदेशीर रित्या शासनाचा महसूल बुडून अवैध वाळू वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यावरून कुंडलवाडी पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे,पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर,पोहेकाँ रामेश्वर पाटील यांनी दि.६ मे रोजी रोजी पहाटे ५:३० वाजता हुनगुंदा शिवारातील मांजरा नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक करणारे एक ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.२६ एआर १७१४ वर कारवाई केली.या कारवाईत २ लाख रुपयाचे ट्रॅक्टर व ९ हजार रुपयांची दिड ब्रास वाळू असा २ लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## ऑपरेशन सिंदूर ..

शंभरटक्के यशस्वी
हो ऑपरेशन सिंदूर
जयजयकार भारता
किर्तीसुगंध सर्व दूर

दहशतवादीतळावर
घुसले शस्त्रास्त्रे खूर
आगीचा महा प्रलय
डोळ्यांत भरला धूर

नऊएअर स्ट्राईकर्स
आतंकी चिरडी क्रूर
धन्यवाद लष्काराचे
सैन्यदलभक्कमशूर

पाक छाती धड धडे
उठले भितीचे काहूर
पहलगाम हल्ल्याची
अंमळ हलकी हुरहूर

पाकनाक वर करता
विचारकरणार जरुर
उध्वस्त पुढे मनसुबे
जाई रसातळा गुरूर

इतिहासात नोंद करे
तिरंगा विश्वा मशहूर
हा तर केवळ आरंभ
अजूनकरे चक्काचूर


**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# कला व साहित्यप्रेमी - रवींद्रनाथजी टागोर

मानवी स्वभाव, नैतिक मूल्ये, आणि सामाजिक नियम या सर्व गोष्टींचे भान ठेवुन आधुनिक साहित्यात व्यक्तिमत्व, सामाजिक बदल,आणि राजकीय विचार याबरोबर प्राचीन संस्कृती आणि इतिहासाशी संबंधित सांगड घालून रवींद्रनाथजी टागोर यांनी साहित्याच्या सर्व प्रकारातील लिखाण केले. बहुआयामी साहित्यिक टागोरजींना १९१३मध्ये साहित्य क्षेत्रातून नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले होते. आजतागायत भारतीय साहित्यिकाला मिळालेले हे एकमेव नोबेल आहे.रवींद्र नाथजी टागोर यांना लहाणपणा पासुनच वाचन, लिखाणाची आवड होती वयाच्या आठव्या वर्षी पहिली कविता लिहली. भारतातील बहूभाषेचे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी ते सदैव तत्पर असत. कि जेणेकरून भारतातील सर्व राज्यातील प्राचीन संत साहित्य, महापुरुषांचे लिखाण वाचण्यास संधी भेटेल.जेव्हा टागोरजींनापुढील शिक्षणासाठी विदेशात जायचं होतं, त्यासाठी इंग्रजी भाषेचं ज्ञान हवं म्हणून भाषा शिकण्यासाठी त्यांचे मोठे बंधू सत्येनंद्रनाथ टागोर यांनी त्यांचे महाराष्ट्रातील मित्र मराठी व्याकरणकार, समाजसुधारक श्री आत्माराम उर्फ दादोबा पांडुरंग तरखडकर यांच्याकडे दोन महिने पाठवले. वयाच्या सतराव्यावर्षी टागोरजीं महाराष्ट्रात वास्तव्यास असतांना त्यांनी महाराष्ट्र संस्कृती चीं ओळख करून घेतली आणि विशेष म्हणजे संत तुकोबाराय यांची गाथा अभ्यासली असता, त्यांनी गाथेतील काही निवडक अभंग बंगाली भाषेत अनुवादीत केले. या दोन महिन्याच्या कालावधितील एक विलक्षण घटना अशी कि,तरखडकर यांची कन्या अन्नपूर्णा हिच्यासोबत टागोरजींचे प्रेमसूत जुळले. त्या वयाने तीन वर्ष मोठयाहोत्या.त्याच बरोबर इतर सामाजिक बंधने यामुळे रवींद्रनाथ टागोर यांच्या वडीलांकडून विवाहास विरोध होता.विरहातुन त्यांनीनलिनी नावाचं नाटक लिहलं. नलिनी हे अन्नपूर्णासाठी वापरलेल्या टोपण नावावरून त्यांनी ह्या नाटकाची रचना केली. तेव्हा पासुन टागोरजींनी साहित्य क्षेत्रातील मनातील माणूसपण जपून विपुल लिखाण केले.

कलाप्रेमी टागोरजींनी संगीत, साहित्य, तत्त्वज्ञान, चित्रकला, नृत्य, शिक्षण अशा बहुविध क्षेत्रातील ज्ञान आत्मसात केले. रवींद्रनाथाच्या निर्मितीत काव्य लेखन जरी प्रमुख साहित्यनिर्मिती असली तरी त्याबरोबर कादंबऱ्या, निबंध, लघुकथा, प्रवासवर्णने, नाटके अशा बहुविध साहित्याची निर्मिती त्यांनी केली. कवितेनंतर रवींद्रनाथांची लघुकथा ही प्रमुख रचना मानली जाते. रवींद्रनाथ हे बंगाली भाषेतील आद्य लघुकथाकार समजले जातात. सामान्य माणसांच्या जीवनातील संघर्ष मेहनत हे त्यांच्या कथांचे स्रोत आहे. १५-१६ व्या शतकातील वैष्णव रचनांचा रवींद्रनाथांवर प्रभाव होता.भारतीय परंपरेतील संत, ऋषीं संकल्पनेचाही रवींद्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव दिसून येतो. गावोगावी गीत-गात फिरणाऱ्या फकिरांसारख्या 'बाऊल' कलाकारांची ग्रामीण बंगालमध्ये



परंपरा आहे. बाऊल स्वतःस कोणत्याही एका धर्माचे मानत नाहीत. त्यांच्या गीतांत हिंदू, मुस्लिम अशा दोन्ही धर्माची शिकवण दिसून येते. रवींद्रनाथांनी या परंपरेस बुद्धिजीवी वर्तुळात पूर्वी नसलेली प्रतिष्ठा दिली. त्यांच्या बाऊल परंपरेच्या अभ्यासाने त्यांच्या स्वतःच्या काव्यकृतीस नव चैतन्य मिळाले.बंगाली भाषेत सांगायचे तर 'मनेर मानुष'(मनातील माणूस) आणि 'जीवन देवता' ही दोन रूपके टागोरांच्या कवितेत व इतर साहित्यामध्ये प्रकर्षाने दिसून येतात. रवींद्रनाथांनी 'चतुरंग', 'शेषेर कबिता' (शेवटच्या कविता), 'चार अध्याय', 'नौका डुबी', 'घरे बाईरे' या सारख्या चार लघुकांदबऱ्या व आठ मोठ्या कादंबऱ्या लिहिल्या. 'चतुरंग' ही सचिश नावाच्या परस्परविरोधी संकल्पनांत अडकलेल्या पात्राची कहाणी आहे. धार्मिक गूढतेतून आयुष्याचा अर्थ शोधणाऱ्या कथानायकाचा अंती होणारा भ्रमनिरास टागोरांनी या कादंबरीतून मांडला आहे.'शेषेर कबिता' (शेवटच्या कविता) ही कवितेने नटलेली कादंबरी. यात 'रवींद्रनाथ ठाकूर' हे स्वतःचेच नाव सांगणाऱ्या 'प्रसिद्ध कवी'वर टागोर त्रयस्थपणे टीका करतात. 'चार अध्याय' ही रवींद्रनाथांची शेवटची कांदंबरी. 'राष्ट्रभक्ती' म्हणजे काय?राष्ट्र कसे बनते?, केवळ घोषणाबाजी, कठोर शिस्त यातून खरे स्वातंत्र्य शक्य आहे काय? अशा प्रश्नांचा उहापोह ही कादंबरीतुन दिसून येतो.

साहित्यप्रेमी रवींद्रनाथजीं टागोरयांनी रचलेल्या व चाल दिलेल्या जवळपास २२३० गीतांना एकत्रितपणे रवींद्रसंगीत असे म्हणतात. त्यातील गगनेर खाले रबि चन्द्र दीपक ज्बले हे रवींद्रनाथांनी रचलेले पहिले गीत तर, हे नूतन देखा दिक आरो बारो हे शेवटचे गीत दिसून येते.रविंदनाथजीं टागोर हे जगाच्या पाठीवरील पहिले राष्ट्रगीतरचनाकार कि ज्यांची राष्ट्रगीते दोन देशासाठी गायली जातात.आपल्या भारत देशाचे राष्ट्रगीत जन- गण- मन तर, अखंड भारतातील हिस्सा असणारे बांग्ला प्रांत तर आताच्या बांगलादेशचे राष्ट्रगीत आमार शोनार बांग्ला ह्या रचना टागोरजींच्या रवींद्रसंगीताचा हिस्सा आहेत. संगीत प्रेमी अभिजात भारतीय संगीत, बंगाली लोकसंगीत व अभिजात पाश्चात्य संगीत ह्या रवींद्रसंगीताच्या प्रेरणा मानल्या जातात. अभिजात भारतीय संगीतातील ठुमरी शैलीचा रवींद्रसंगीतावर मुख्य प्रभाव आहे. ही गीते रवींद्रनाथांच्या स्वतःचे तत्त्वचिंतन दाखवत असली तरी त्यांवर वैष्णव व उपनिषदीय तत्त्वज्ञानाचीही झलकही दिसते. रवींद्रसंगीतातील गीते ही विविध रागांमध्ये बांधण्यात आली असून रागाचा व गीताचा भाव यात सुसंगती असते.अनेक गीतांमध्ये विविध रागांना एकत्र बांधून नवसृजन केलेले दिसते.अभिजात भारतीय संगीतातून प्रेरणा घेतलेल्या रवींद्रसंगीत हे नंतर अनेक अभिजात भारतीय संगीताच्या गायकवादकांचे प्रेरणास्रोत ठरले.

माणूस हा अजन्म विद्यार्थी असतो. एखाद्या क्षेत्रातील गोडी, प्रेम आवड अन हृदयापासून जाणून घेण्याची तळमळ निर्माण झाली कि, त्याला वयाची अट नसते यातील जिवंत उदा. म्हणजे रवींद्र नाथ टागोर. यांनी वयाची बंधने झूगारून वयाच्या ६० च्या वर्षी चित्रे रेखाटायला सुरुवात केली. द. फ्रान्स मधील कलाकारांच्या प्रेरणेवरून त्यांच्या चित्रांची पॅरिस मधील पहिल्या प्रदर्शनासह युरोपभर अनेक प्रदर्शने झाली.मात्र आयुष्याच्या या उतरत्या काळात रवींद्रनाथांना रंगांधळेपणाचा त्रास सुरू झाला होता.तरीसुद्धा स्वतःच्या कृतींची हस्तलिखितेही त्यांनी त्यांच्या कलाकारीतुन उत्कृष्ट रित्या सजवली आहेत.

अश्याप्रकारे बहूआयामी रवींद्रनाथजींचे साहित्य व कला क्षेत्रात खूप मोठे योगदान आहे. 'वाल्मिकी प्रतिभा'. 'चंडालिका', 'विसर्जन', चित्रांगदा', 'राजा', 'मायार खेला' ही रवींद्रनाथांची इतर नाटके.या नाटकांसोबत टागोरांच्या 'नृत्य-नाटिका' विशेष प्रसिद्ध आहेत.गल्पगुच्छ'नावाचा रवींद्रनाथांचा ८४ लघुकथांचा ३ खंडी संग्रह प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र संस्कृतीसोबतही टागोर जींची नाळ जुळलेली दिसून येते. संत तुकारामांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. संत तुकारामांचे काही अभंग त्यांनी बंगाली भाषेत अनुवादित केले आहेत.छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनही त्यांच्या साठी प्रेरणास्थान होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित त्यांनी एक खंडकाव्य ही त्यांनी रचले आहे. रवीन्द्रनाथांच्या व्यक्तिमत्त्वाने काही महाराष्ट्रीयही प्रभावित झाले होते. रविंद्रनाथ यांचे साहित्य मूळ बंगालीतून वाचण्याच्या तीव्र ओढीने पु.ल.देशपांडे हे बंगाली भाषा शिकले. जन्माने महाराष्ट्रीयन असलेल्या परंतु मराठी व कानडी भाषेत लेखन केलेले व कानडी भाषेतील आधुनिक साहित्यातील सर्वश्रेष्ठ कवी द.रा.बेन्द्रे जेष्ठ यांच्या साहित्यावरही रवीद्रनाथांचा प्रभाव आहे.त्यांच्या साहित्यातून मानवी संस्कृती, नीतिमल्याचे ज्ञान, मनातील माणसांच्या वेदना, तळमळ, राष्टप्रेम अश्या विविध पैलूचे दर्शन घडते, जे आजही आपल्याला प्रेरणा आणि ज्ञान देण्यास मदत करते.

**कला व साहित्यप्रेमी गुरु रवींद्रनाथजीं टागोर यांना जयंती निमित्त विनम्र अभिवादन**

**- श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं. ९७६३२८२०७७**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## परिक्रमा सायन्स कॉलेज काष्टी ची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.०७, काष्टी (अहिल्यानगर) :** बबनराव पाचपुते विचारधारा ट्रस्ट चे परिक्रमा सायन्स कॉलेज या विद्यालयाचा इयत्ता बारावी फेब्रु/मार्च २०२५ परीक्षेचा निकाल महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ यांचेकडून जाहीर झाला असून यामध्ये

१.जाधव भक्ती काशिनाथ -८४.००%
२.चव्हाण कृष्णा यशवंत -८२.००%
३.कुलकर्णी तनिष्का अरुण ८१.००
३.खामकर सिद्धी - ८१.००%

यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविला असून विद्यालयाचा एकूण निकाल ९९.११% एवढा लागला. तरी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक मा.मंत्री.श्री. बबनरावजी पाचपुते, संस्थेच्या अध्यक्षा प्रतिभाताई बबनराव पाचपुते, संस्थेचे सचिव आ.विक्रमसिंह पाचपुते, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा.ॲड. प्रतापसिंह पाचपुते, अकॅडेमीक डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा.अनिल पुंड, डेप्युटी अकॅडेमीक डायरेक्ट डॉ.संजीव कदम पाटील, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. इथापे पी. ए. व सर्व विभागाचे प्राचार्य तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक प्रगतीस शुभेच्छा दिल्या.

## बेलापूर येथील अनधिकृत झोपड्या निष्कासित




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, (नवी मुंबई) :** महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उपायुक्त (अतिक्रमण) भागवत डोईफोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात बेघर हटविणेसाठीची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील, दुर्गामाता नगर सेक्टर -०८, बेलापूर, नवी मुंबई, येथे असलेल्या भुंखडावरील अनधिकृत झोपडया स्वत:हून हटविणे आवश्यक होते. अे - विभाग कार्यालय बेलापूर मार्फत तोडक कारवाईचे आयोजन करुन, सदर भुखंडावरील ६४ अनधिकृत झोपडया निष्कासित करण्यात आलेल्या आहेत.

या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी डॉ.अमोल पालवे, अे विभाग बेलापूर येथील अधिकारी/ कर्मचारी तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. सदर मोहिमेकरीता पोकलन, मजूर, वाहन, पिकअप, स्थानिक पोलिस तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलिस तैनात होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## शंतनु क्षिरसागर विज्ञान शाखेतुन प्रथम तर कला शाखेतुन ऋतुजा शेटे प्रथम...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०७, मुदखेड (नांदेड) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीची परीक्षा फेब्रुवारी - मार्च २०२४- २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे इयत्ता बारावी विज्ञान व कला शाखेच्या परीक्षेत महात्मा गांधी जुनियर कॉलेज मुदखेड च्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी ९२ टक्के एवढे गुण घेवून उत्तुंग अशी भरारी घेतली असुन त्यांनी आपल्या यशाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे

महात्मा गांधी ज्युनिअर कॉलेजचे एकूण विद्यार्थी विद्यार्थिनी २५६ परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी विशेष प्राविण्य सह ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर ३१ विद्यार्थी प्रथम श्रेणी मध्ये आले आहेत

त्यापैकी कला शाखेचे १६० विद्यार्थी विद्यार्थिनी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी १४८ विद्यार्थी विद्यार्थिनी उत्तीर्ण झाले आहेत तर विज्ञान शाखेचे ८२ विद्यार्थी विद्यार्थिनी परीक्षेत प्रविष्ट झाले होते त्यापैकी ८१ विद्यार्थी विद्यार्थिनी पास झाले आहेत विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९८.७८ एवढा लागलेला आहे तर कला शाखेचा एकूण निकाल ९२.५०एवढा लागलेला आहे

कला शाखेतून ऋतुजा अनिल शेटे हिने ८९.६७ एवढे गुण घेवुन प्रथम क्रमांक मिळविला आहे तर द्वितीय क्रमांक प्रतीक्षा राठोड हिने ७९.७६गुण मिळविले आहेत तिसरा क्रमांक प्रिती कोंडीबा निखाते हिने ७८.८३ टक्के गुण मिळविले आहेत तर विज्ञान शाखेत पहिला क्रमांक क्षिरसागर शंतनु रविंद्र याने ७२.१७% टक्के तर दुसरा पवार जयदेव भगवानराव याने ६३.१७% टक्के तसेच तिसरी समिक्षा सुर्यवंशी ६२.१७% टक्के गुण प्राप्त केले आहेत.

यशस्वी झालेल्या मुला मुलींनी आपल्या यशाचे श्रेय आई वडील आणि प्राचार्य तसेच सर्व मार्गदर्शन करणारे शिक्षक प्राध्यापक यांना दिले आहेत.

यशस्वी झालेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींचे अभिनंदन महात्मा गांधी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राम चौधरी, सचिव लक्ष्मण सोनटक्के, उपाध्यक्ष रामप्रसाद सोनी, कोषाध्यक्ष शंकररावजी पचलींग, शिक्षक प्रतिनिधी किरण देशपांडे, प्राचार्य बाबुराव नाईक, उपप्राचार्य अभया लोहगावकर, शिक्षक नेते यशवंत कांबळे, कार्यालयीन अधीक्षक रघुनाथ मिटके, प्राध्यापक ज्ञानेश्वर गरुडकर, प्राध्यापक दिनेश शेटे,प्राध्यापक सूर्यकांत गौंड, प्राध्यापक मंगनाळे दत्ता, प्राध्यापक अमृत जाधव, प्राध्यापक प्रेम कुमार कौशल्य, प्राध्यापक त्र्यंबक अन्नलदास, प्राध्यापक इंजेवाड, प्राध्यापक कदम, प्राध्यापक गिरी, प्राध्यापक मोरे अलका, ग्रंथपाल सुनिता भोनगिनवार, वरिष्ठ लिपिक चंद्रकांत वाघमारे, लिपिक सुप्रिया डुडूळे, धर्माजी पल्लेवाड, विजय वाढे, कार्तिक वडे, आदींसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले आहे.

# ठाण्यात उद्या पुन्हा पाणीबाणी...!



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०७, ठाणे :** मे महिना सुरु होताच उन्हाचा तडाखा जाणवायला सुरुवात झाली आहे. अशातच आता पाणी कपातीच्या आव्हानाला ठाणेकरांना सामोरं जावं लागत आहे. ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा – मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभाग समिती मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पाणी पुरवठा केला जातो.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणी पुरवठा योजनेच्या अंतर्गत जांभूळ जलशुध्दीकरण केंद्रातील अत्यंत महत्वाचे देखभाल दुरुस्तीचे काम करावयाचे असल्याने कटाई नाका ते ठाणे दरम्यान गुरुवार दि. ८ मे रोजी रात्री १२ वाजल्यापासून ते शुक्रवार ९ मे रात्री १२ वाजेपर्यंत सलग चोवीस तास पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

पावसाळ्यापूर्वी महापालिका आयुक्तांनी घेतला आढावा, केल्या 'या' महत्त्वपूर्ण सूचना

या शटडाऊन कालावधीत ठाणे महानगरपालिकेअंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र.२६व ३१चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समिती मधील सर्व भागामध्ये, व वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा, किसननगर नं.२, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणी पुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहणार आहे.


दरम्यान पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होईल याची नागरिकांनी नोंद घ्यावी. या शटडाऊन कालावधीत पाणी काटकसरीने व जपून वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास...

# डोळे दिपवणाऱ्या संग्रहालयाच्या माध्यमातून जनतेसमोर येणार....

### संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात...

### प्रधानमंत्री यांच्या हस्ते होईल उद्घाटन





**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, नवी दिल्ली :** छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल राष्ट्रीय समितीच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा दैदिप्यमान इतिहास डोळे दिपवणाऱ्या संग्रहालयाच्या माध्यमातून जनतेसमोर उभा करण्यात येत आहे. या संग्रहालयाचे काम अंतिम टप्प्यात असून या संग्रहालयाचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होईल, अशी माहिती समितीचे महासचिव कर्नल मोहन कात्कीकर (सेवानिवृत्त), मिलिंद पाटील यांनी आयोजित पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी गार्डियन मीडिया आणि इंटरटेनमेंट चे संचालक संजय दाबके हे ही उपस्थित होते. श्री दाबके यांच्या माध्यमातून अत्याधुनिक अद्यावत असे संग्रहालय मूर्त रूपात उभे राहत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज मेमोरियल राष्ट्रीय समिती ही दिल्लीतील इन्स्टिट्यूशनल एरिया कुतुब एन्क्लेव्ह या ठिकाणी आहे. या इमारतीचे उद्घाटन तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते झाले होते. या ठिकाणी जागतिक दर्जाचे छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक संग्रहालय राजधानी दिल्लीत असावे असा मानस समितीचा होता. त्याप्रमाणे वर्ष २०२० पासून यावर काम सुरू आहे. अशी माहिती, श्री कात्कीकर यांनी यावेळी दिली.

उत्तर भारतामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दलची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचवावी यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने संग्रहालय उभारण्यात येत असल्याची माहिती श्री कात्कीकर यांनी यावेळी दिली.

हे संग्रहालय छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने तयार करण्यात आलेले आहे. पाच मजली इमारतीच्या तळ मजल्यात हे संग्रहालय असणार आहे.

या संग्रहालयातील वस्तू या ऐतिहासिक दस्ताऐवजांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या आहेत. संग्राहालय पाहताना महाराजाच्या काळात आपण आहोत असा आभास निर्माण करण्यात आलेला आहे. संग्रहालयातील काही भागांमध्ये १३ डी या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आहे.

यासह डार्क राईडच्या माध्यमातून शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांना पाहता येईल. हे देशातील एक अभूतपूर्व असे संग्रहालय असणार आहे.

# अल्पसंख्यांक समाजातील मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी शाळांना आवश्यक सुविधा पुरविणार - आ.इंद्रिस नायकवडी

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०७, धाराशिव :** अल्पसंख्याक समाजातील मुलांच्या शिक्षणाचे प्रमाण प्रचंड मोठ्या प्रमाणात घटलेले आहे. त्यामुळे त्या समाजाचा सामाजिक आर्थिक व शैक्षणिक विकास खुटलेला आहे. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक असलेले शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी अल्पसंख्याक शाळा व मदरसा यांना आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देणार असल्याचे आश्वासन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अल्पसंख्यांक विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इंद्रिस नायकवडी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दि.६ मे रोजी दिले.

धाराशिव शहरातील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश संघटक सचिव खलील पठाण, जिल्हाध्यक्ष असद पठाण, जिल्हा कार्याध्यक्ष समियोद्दीन मशायक, प्रदेश उपाध्यक्ष शफी शेख, इफ्तेखार मुजावर, धाराशिव तालुकाध्यक्ष नासिर शेख आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ नायकवडी म्हणाले की, महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाच्या प्रॉपर्टी



म्हणजेच कब्रस्तान व इतर जागांचे संरक्षित करण्यासाठी संबंधित आदेश दिले असून येत्या २०२५-२६ व २०२६-२७ या दोन राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील मालमत्ता विकास आराखडा तयार करून त्याचा विकासात्मक कायापालट करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

जुलै २०२३ मध्ये पक्षाचे प्रमुख उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सत्तेमध्ये जाण्याचा निर्णय घेतला. त्यास दीड वर्ष झाले असून या कालावधीत अल्पसंख्याक समाजासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी केली असल्याचे सांगत ते म्हणाले की, राष्ट्रवादी अल्पसंख्यांक विभागाच्या माध्यमातून अल्पसंख्याक समाजासाठी कोणकोणत्या प्रकारची विकासाची कामे केली तसेच भविष्यात करण्यात येणार आहेत याची माहिती सर्व समाज बांधवांना माहिती व्हावी यासाठी कार्यकर्त्यांच्या माध्यमातून कार्यक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. मी कालपासून राज्यात विकास कामे कोणती केली याची माहिती मिळावी ? पक्षाची भूमिका समजावी यासाठी दौरा करीत असून त्यास कार्यकर्त्यांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. राज्यात सहा पक्ष असून त्यापैकी तीन पक्ष सत्तेत आहेत. मात्र अल्पसंख्याक समाजासाठी फक्त राष्ट्रवादी काँग्रेस चांगले काम करीत असल्याचा दावा त्यांनी केला.

मौलाना आझाद महामंडळाची स्थापना केली त्यावेळी त्यामध्ये कर्ज देण्यासाठी काही अटी टाकण्यात आलेल्या होत्या. मात्र बदलत्या काळात त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक असून या विशेष म्हणजे अल्पसंख्याक समाज जोपर्यंत शिक्षण घेत नाही. तोपर्यंत समाजाची प्रगती होणार नसल्याचे त्यांनी नमूद केले. अल्पसंख्यांक शाळा वर काही इतर भाषिक शिक्षकांची पोर्टलद्वारे भरती केली गेली आहे. मात्र, त्या शाळांमध्ये उर्दू भाषेचे विद्यार्थी असून त्यांना उर्दू या मातृभाषेतच शिक्षण मिळणे आवश्यक त्यामुळे त्या शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होत असून यापुढे फक्त उर्दू माध्यमाचे शिक्षक भरती केले जाणार असल्याचे आ नायकवडी यांनी सांगितले.

# १८६६ कोटींच्या तुळजाभवानी तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास शिखर समितीसह मंत्रिमंडळाची मान्यता

## पाठपुराव्याला यश; मुख्यमंत्री यांच्यासह सरकारचे आभार - आमदार पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०७, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्याची अभिमानास्पद ओळख असलेल्या तीर्थक्षेत्र तुळजापूरचा आता पूर्णतः कायापालट होणार आहे. कुलस्वामिनी आई तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी आपल्या राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १८६६ कोटी रूपयांच्या तुळजापूर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास शिखर समितीसह मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. ठाकरे सरकारच्या अडीच वर्षाच्या काळात साफ दुर्लक्ष झालेल्या या विकास आराखड्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे मान्यता मिळाली आहे. आपण केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून महायुती सरकारने मोठे पाठबळ दिल्याबद्दल राज्य सरकारचे मनापासून आभार मानत असल्याचे मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकासासाठी व्यापक विकास आराखड्याची व्यापक संकल्पना आपण मांडली होती. ठाकरे सरकारच्या काळात त्याकडे साफ दुर्लक्ष करण्यात आले होते. मात्र राज्यात आपले महायुती सरकार आल्यानंतर प्राधान्याने हा विषय मार्गी लागला आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे अगदी सुरुवातीपासून या महत्त्वाच्या आराखड्याकडे व्यक्तिशः लक्ष होते. मागील महिन्यात तुळजापूर दौऱ्यावर आले असता त्यांनी जीर्णोध्दाराच्या कामांची पाहणी केली होती.आराखड्याचे सादरीकरण पाहत सर्व बाबी अत्यंत गांभीर्याने जाणून घेत काही महत्वाच्या सूचनाही केल्या होत्या व तत्वतः मंजुर देखील केला होता.

आदरणीय मुख्यमंत्री फडणवीस साहेबांमुळे आई तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा महत्वपूर्ण प्रकल्प मार्गी लागला आहे. पुढील ३ वर्षांच्या आत ही सगळी कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने या आराखड्यास आता अंतिम मंजुरी दिली असून त्यासाठी महायुती सरकारसह राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांचे आभारही आमदार पाटील यांनी मानले आहेत.

तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात मुखदर्शन मंडपासह तेथील अनुषंगिक सोयी-सुविधांचा समावेश असणार आहे. श्री तुळजाभवानी माता छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी तलवार देत असतानाचा १०८ फुटाचे भव्य शिल्प जाणार आहे. त्याचबरोबर घाटशीळ, सोलापूर महामार्ग, हडको आदी ठिकाणी भक्तनिवास, प्रसादालय, पुस्तकालय, भोजनालय आणि भाविकांसाठी विविध सोयी-सुविधांचे सुसज्ज केंद्र तयार केले जाणार आहे. तसेच वाहनतळ आणि वृंदावन गार्डनप्रमाणे अत्याधुनिक उद्यानही साकारले जाणार आहे. तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी येणार्या वृध्द व दिव्यांग भाविकांकरिता लिफ्ट, ट्रॅव्हलेटर आदी बाबींचाही यात अंतर्भाव करण्यात आला आहे.

अंतिम विकास आराखड्याप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेल्या विकासकामांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता देखील मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद यात करण्यात आली आहे. भूसंपादनाबरोबर शासनाच्या विविध करासाठी लागणारे शुल्क तसेच विकासकामांसाठी लागणारा निधी आदी बाबींना हिरवा कंदील मिळाल्यामुळे तुळजापूर आणि परिसराचा चेहरामोहरा अधिक ठळकपणे बदलला जाईल, असेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र वैश्विक दर्जाचे धार्मिक पर्यटन केंद्र म्हणून विकसित व्हावे. यासाठी सर्वांच्या सहमतीने हा आराखडा स्वीकारण्यात आला आहे. पुजारी, भाविक व शहरवासीयांच्या सूचनांचा अभ्यास करून त्या सर्वांचे आक्षेप आणि सूचनांचा गांभीर्याने विचार करून या आराखड्यात समावेश करण्यात आला आहे. शहरात तसेच शहराकडून सोलापूर, बार्शी, धाराशिव, औसा आणि नळदुर्ग या पाचही दिशेला जाणार्या प्रमुख रस्त्यांवर तुळजापूर शहराच्या प्रवेशाजवळ आकर्षक आणि भव्य कमानी बसविण्याच्या अनुषंगाने लवकरच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेण्याचे ठरले असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

**भूसंपादनासाठी प्रचलित दराच्या कैकपट मावेजा -**

तुळजापूर शहरातील नागरिक आणि पुजारी बांधवांना विश्वासात घेवून भूसंपादन प्रक्रिया राबविली जाणार आहे. प्रचलित दराच्या कैकपटीने मावेजा देवून विकास आराखड्यासाठी जमिनीचे भूसंपादन केले जाणार आहे. त्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या या अंतिम विकास आराखड्यात ३० टक्के आर्थिक तरतूद केवळ भूसंपादन प्रक्रियेसाठी करण्यात आली आहे. त्यामुळे ज्यांची जागा तीर्थक्षेत्र विकासासाठी संपादीत केली जाणार आहे. त्यांना समाधानकारक आणि रास्त मावेजा मिळणार आहे.

सर्वांच्या संमतीने आणि सर्वांना विश्वासात घेवून जमिनीचा चांगला मोबदला दिला जाणार आहे. आई तुळजाभवानी देवीचे तीर्थक्षेत्र जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित करण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

# थोडक्यात

## रस्ते तात्काळ मोकळे करून नागरिकांना दिलासा द्यावा अन्यथा न्यायालयात जाणार - मुंडे



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील सर्व रस्ते हे फेरीवाल्यांनी अतिक्रमण केल्याने वाहतुकीस अडचण निर्माण करणारे झाले आहेत. दिवा शहरातील प्रमुख रस्ते फेरीवाला मुक्त करा आणि शहरातील लाखो नागरिकांना दिलासा द्या. अन्यथा प्रशासनाच्या गलथान कारभाराविरोधात न्यायालयात दाद मागणार असा इशारा ठाकरे गटाचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी दिला आहे. रोहिदास मुंडे यांनी याबाबत दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त यांना पत्र दिले असून त्यात म्हटले आहे की, या फेरीवाल्यांना रस्त्यावर बसवणारे दिवा शहर बकाल करत आहेत  दिव्यात एकही रस्ता हा मोठा नाही अशा स्थितीत आहेत ते रस्ते फेरीवाल्यांनी व्यापल्याने येथील ५ लाख जनतेने चालायचे कुठून आणि वाहन चालकांनी वाहने कुठून चालवायची. फेरीवाल्यांना ज्याने अभय दिले आहे. त्यांच्या आर्थिक हितसंबंध या लोकांशी आहेत. ४ पैशांसाठी दिवाशहराची वाट लावण्याचे काम केले जात आहे. दिवा स्टेशन ते आगासन रस्ता, दिवा स्टेशन ते मुंब्रा देवी कॉलनी रस्ता, दिवा स्टेशन ते दिवा टर्निंग हे सर्वच रस्ते फेरीवाल्यांनी व्यापले आहेत. यामुळे वाहतूक कोंडी होत असून नागरिकांना चालण्यासाठी देखील जागा मिळत नाही असे मुंडे यांनी या पत्रात म्हटले आहे. याबाबत सहाय्यक आयुक्त यांनी तातडीने फेरीवाल्यांवर कारवाई करून दिवा स्टेशन रोड मुंब्रा देवी कॉलनी, दिवा आगासन रोड फेरीवाला मुक्त करावा.

फेरीवाल्यांना पालिकेने फेरीवाला झोन जाहीर करून त्या ठिकाणी फेरीवाले पालिकेचे बसवावेत जेणेकरून त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण होणार नाही. नवी मुंबई ज्या पद्धतीने आतील रस्त्यांना किंवा गल्लीमध्ये फेरीवाला क्षेत्र असते किंवा एखाद्या मैदानात फेरीवाले असतात त्या पद्धतीने दिवा शहरात रचना करावी. मुख्य रस्त्यांवर असणारे फेरीवाले हटवून रस्ता नागरिकांसाठी मोकळा करावा अन्यथा या विरोधात नागरिकांच्या सहकार्याने न्यायालयात दाद मागणार असा इशारा दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी दिला आहे.

## ढोकेश्वर विद्यालयाची उत्कृष्ट यशाची परंपरा कायम

### विज्ञान ९४ टक्के तर कला चा ७२ टक्के निकाल



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** बारावी बोर्ड परीक्षेत अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचालित श्री ढोकेश्वर महाविद्यालयाने नेत्रदिपक यश संपादन केले. यात ढोकेश्वर विद्यालयाचा बारावी शास्त्र शाखेचा निकाल ९४.९० टक्के लागला असून बारावी कला शाखेचा निकाल ७२.७२ टक्के लागला आहे. शास्त्र शाखेत एकूण २१६ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ठ झाले होते तर त्यापैकी २९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. कला शाखेत एकूण ८९ विद्यार्थी प्रविष्ठ झाले तर त्यापैकी ६४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. शास्त्र शाखेत चि.अथर्व बाळासाहेब थोपटे (८१%) प्रथम, चि. ऋषिकेश अशोक जाधव (७२.३३%) द्वितीय, कु. वेदिका गणेश ठाणगे (७०%) तृतीय, कु. प्रणिती अशोक गांगड (६९.८३%) चतुर्थ तर कु. सुहानी सुजित झावरे(६८%) ही पाचवी आली आहे.

कला शाखेत कु. रुकैय्या कासम मोमिन (७०.६७%) प्रथम, कु. बारकबाई दत्तोबा तिखोळे (६९%) द्वितीय, कु. अंजली छबू रोकडे (६७%) तृतीय, कु. कोमल तुळशीराम उमाप (६५.१७%) चतुर्थ तर कु. रुकुय्या बशीर शेख (६४.६७%) पाचवी आली. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना अशोक गांगड, विजय सोबले, गोवर्धन मते, शिवाजी नरसाळे, योगेश मांडगे, अशोक वाघ, राजेंद्र ढोणे, आतिष झावरे, सचिन महानवर, भाऊसाहेब हिंगडे, नितीन ढोकळे, भाऊसाहेब खोसे, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, रामदास नरवडे, मिना खाडे, सिमा खोसे, धनश्री निवडुंगे इत्यादी प्राध्यापकांनी वर्षभर मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सचिव ॲड.विश्वासराव आठरे पाटील, सहसचिव जयंत वाघ, जिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे व संस्थेचे जेष्ठ विश्वस्त व माजी अध्यक्ष नंदकुमार झावरे पाटील, ज्येष्ठ विश्वस्त जी.डी.खानदेशे, सिताराम अण्णा खिलारी, गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी, प्राचार्य सुनिल वाव्हळ, पर्यवेक्षक बाळासाहेब खिलारी, ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब निवडुंगे, टाकळी ढोकेश्वर परिसरातील शिक्षण प्रेमी पालक, विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्चा इयत्ता १२ वीचा निकाल १०० टक्के

## वैदेही कुलकर्णी, कियान जैन, प्रणाली पाटील ८५ टक्क्यांच्या पुढे; संस्थेतर्फे विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०७, खडकवासला (पुणे) :** न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस्च्या जाधवर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्यू. कॉलेज, पॅराडाईज ज्यू.कॉलेज आणि शार्दुल सुधाकरराव जाधवर कॉमर्स अँड सायन्स ज्युनियर कॉलेज चा इयत्ता १२ वीचा १०० टक्के लागला आहे. संस्थेतील वैदेही कुलकर्णी, कियान जैन, प्रणाली पाटील यानी ८५ टक्क्यांच्या पुढे गुण मिळवित उत्तम यश संपादन केले आहे. जाधवर ग्रुपचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर, उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर यांसह सर्व प्राचार्य, शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.जाधवर इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्यू. कॉलेजच्या विज्ञान शाखेत वैदेही कुलकर्णी (८५ टक्के), ईशान पवार (८०.१७ टक्के), देवाशीष घोरमाडे (८० टक्के) यांनी तसेच वाणिज्य शाखा इंग्रजी माध्यमात प्राची बाबर (८१.३३ टक्के), अमरनाथ वाघमारे (७९ टक्के), अनिष नेवासकर (७७.१७ टक्के) यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे.

पॅराडाईज ज्यू. कॉलेजमधील विज्ञान शाखेत कियान जैन (८५ टक्के), रिया गोखले (८४.५० टक्के), हर्ष बो-हाडे (८४.१७ टक्के), वाणिज्य शाखा मराठी माध्यमात क्रांती पवार (६८.५० टक्के), मनिषा नेपाली (६६.३३ टक्के), तन्वी तेलंगी (६२.६७ टक्के) यांसह कला शाखेत नेहा लवाटे (६५.६७ टक्के), नंदीनी दगडे (६३.६७ टक्के), जान्हवी भालेराव (६२.३३ टक्के) यांनी उत्तम गुण पटकाविले.

शार्दुल सुधाकरराव जाधवर कॉमर्स अँड सायन्स ज्युनियर कॉलेजमधील विज्ञान शाखेत प्रणाली पाटील (८५ टक्के), आर्या पारगांवकर (८४ टक्के), श्रेया जोशी (८२.५० टक्के) तसेच वाणिज्य शाखेत तनुजा काकडे (६५.५० टक्के), अंजली राऊत (६०.३३ टक्के), वेदांत शिवशरण (५३ टक्के) यांनी उत्तम गुण मिळवित यश मिळवले आहे. संस्थेतर्फे सर्वांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्राचा तिरंदाजीत सुवर्ण षटकार, ९ पदकांची लयलूट

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, भागलपूर (बिहार) :** खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेच्या सातव्या पर्वात तिरंदाजीमध्ये महाराष्ट्राचाच बोलबाला बघायला मिळाला. मराठमोळ्या तिरंदाजांनी तब्बल ६ सुवर्ण, २ रौप्य व एक कांस्य अशी एकूण ९ पदकांची लयलूट करीत सर्वसाधारण विजेते पद ही पटकाविले. गतवर्षी चेन्नईतील स्पर्धेत महाराष्ट्र या क्रीडा प्रकारात उपविजेता ठरला होता.खेलो इंडियाच्या इतिहासात प्रथमच पदकांचा षटकार महाराष्ट्राने झळकविला आहे. गतवेळी ३ सुवर्णांसह ६ पदके महाराष्ट्राने जिंकली होती.

यंदा झारखंड, हरियाणाची मक्तेदारी मोडून महाराष्ट्राने वर्चस्व गाजवित सर्वसाधारण विजेतेपदाचर नाव कारले. विजेत्या खेळाडूंचे क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांच्यासह पथकप्रमुख महादेव कसगावडे यांनी अभिनंदन केले



आहेरिकर्व प्रकारात उज्वल ओलेकरने तमिळनाडूच्या स्मारा सर्वेशचा ६-२ सेटने पराभव करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. मेघालयाचा देवराज मोहपात्रा कांस्यपदकाचा मानकरी ठरला. मुलींच्या रिकर्व प्रकारात शर्वरी शेंडे व वैष्णवी पवार या महाराष्ट्राच्या तिरंदाजांमध्येच अंतिम लढत रंगली. शर्वरीने ६-४ सेटने बाजी मारत सुवर्णपदक जिंकले, तर वैष्णवी रौप्यपदकाची मानकरी ठरली. झारखंडच्या तमन्ना वर्मा हिला कांस्यपदक मिळाले. याचबरोबर रिकर्वच्या मिश्र प्रकारातही महाराष्ट्राने सोने लुटले. ज्ञानेश चेराळे व शर्वरी शेंडे या महाराष्ट्रीयन जोडीने सुवर्णपदकाच्या लढतीत हरयाणाच्या दक्ष मलिक व अन्नू या जोडीचा ५-३ सेटने पराभव करीत सुवर्णपदक जिंकले. कोडांडपानी जथ्या व तोडीबोइना वैष्णवी ही आंध्र प्रदेशची जोडी कांस्यपदकाची मानकरी ठरली.

मुलींच्या कपाऊंड प्रकारात महाराष्ट्राच्या तिरंदाजांनी तिनही पदके जिंकून निर्भेळ यश मिळविले. प्रीतिका प्रदीप हिने सुवर्णपदकाच्या लढतीत आपलीच राज्य सहकारी तेजल साळवे तिच्यावर एक-एक गुणांसाठी रंगलेल्या पाठशिवणीच्या खेळात १४५-१४४ अशी एका गुणाने बाजी मारली. तेजल रौप्य पदकाची मानकरी ठरली, तर वैदेही जाधव हिने कांस्यपदकाची कमाई केली.

मुलांच्या कपाऊंड प्रकारात महाराष्ट्राच्या मानव जाधवने चुरशीच्या अंतिम लढतीत झारखंडच्या दिवांशू सिंगचा १४५-१४४ असा एका गुणाने पराभव करीत सुवर्णपदक जिंकले.राजस्थानचा देवांश सिंग कांस्यपदकाचा मानकरी ठरला. कपाऊंड मिश्र प्रकारात मानव जाधव व तेजल साळवे या जोडीने महाराष्ट्राला सुवर्णपदक जिंकून दिले. महाराष्ट्राच्या जोडीकडून १५२-१५१ असा एका गुणाने पराभव झालेल्या तमिळनाडूच्या मधुरावर्षीनी व आर.मिधुन जोडीला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. अदित्य मित्तल व दृष्टी या दिल्लीच्या जोडीला कांस्यपदक मिळाले. शुभांगी रोकडे-दळवी, सुधीर पाटील, सागर मोरे, त्रिशा संचिती यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राच्या तिरंदाजांनी ही खेलो इंडिया युवा स्पर्धेतील मोहीम फत्ते केली.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राथमिक ही द्यावी; पोलिस अधीक्षक सुदर्शन

### जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समितीची बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील स्कूल बस चालकाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्रथम प्राथमिकता द्यावी, अशी सूचना चंद्रपूर जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांनी केल्या. चंद्रपूर येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात आयोजित जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समितीच्या बैठकीत बोलत होते. या बैठकीला प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, महानगर पालिकेचे उपायुक्त संदिप चिद्रवार, परिवहन महामंडळाच्या विभाग नियंत्रक स्मिता सुतवणे, वाहतुक पोलीस निरीक्षक प्रविण पाटील उपस्थित होते. स्कूल बस मालकाने सुट्टीच्या कालावधीमध्ये सर्व स्कूल बस वाहनांचे मेन्टनन्स करावे. फिटनेस मुदतीत असेल तरी वाहन तपासणीसाठी आरटीओ कार्यालयाकडे सादर करावे. त्यासाठी आरटीओ कार्यालयामध्ये तपासणी कक्ष स्थापन करण्यात आलेला आहे. प्रत्येक स्कूल बसला सीसीटीव्ही लावावेत. प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून पब्लिक ट्रान्सपोर्टने किती विद्यार्थी येतात, याबाबतची माहिती वाहतुक शाखा तसेच प्रादेशिक परिवहन विभागाकडे सादर करावी. वाहनांचे मेंटेनन्स नियमित करावे, वाहनांचे पार्किंग योग्य ठिकाणी करावे. बस चालकाने मद्यपान करुन वाहन चालवू नये. आसन क्षमतेचे उल्लंघन करु नये. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी स्कूलबस नियमावलींचे काटेकोरपणे पालन करावे, मुलींची वाहतुक करणाऱ्या बसमध्ये महिला मदतनिस असणे बंधनकारक आहे. सर्व शाळांनी शालेय परिवहन समितीची स्थापना करुन विद्यार्थ्यांच्या वाहतुकीच्या सुरक्षिततेची खात्री करावी. अनधिकृत ऑटोमध्ये विद्यार्थ्यांची वाहतुक करु नये. विद्यार्थ्यांच्या सुरक्षाविषयक काही सूचना गोपनियरित्या घ्यावयाच्या असल्यास वाहतुक पोलीस निरीक्षक, प्रादेशिक परिवहन अधिकारी, पोलीस अधीक्षक यांना देण्याचेही मुमक्का यांनी सांगितले.

# हरित पनवेलसाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार - अतिरिक्त आयुक्त शेटे

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, पनवेल :** पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी यावर्षी पनवेल महानगर पालिकेमार्फत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवडीची मोहीम आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हाती घेण्यात आलेली आहे. वृक्ष लागवडी सोबत महानगरपालिका हद्दीतील काही सार्वजनिक ठिकाणीही विविध वृक्षांची लागवड करून 'हरित पनवेल' करावे, असे निर्देश अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे यांनी दिनांक ०६ मे २०२५ रोजी मुख्यालयात झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीसाठी उपायुक्त स्वरूप खारगे, सहायक आयुक्त श्रीराम पवार, सर्व प्रभाग अधिकारी, उद्यान व्यवस्थापक उपस्थित होते. स्थानिक परिस्थितीचा अंदाज घेऊन त्या ठिकाणी सहज लावता येतील.

अशा वृक्षांची निवड करून तो भाग, तो प्रभाग हरित करावा, या कामासाठी स्थानिक सोसायटींची मदत याकामी घ्यावी. प्रसंगी संबंधित झाडे जगविण्यासाठी त्या सोसायटीला विनंती करावी,असेही शेटे यांनी यावेळी सांगितले. प्रायोगिक तत्त्वावर पनवेल मनपा हद्दीतील एखादी स्मशानभूमी, एखादे उद्यान निवडून त्या ठिकाणी वृक्षांची लागवड करावी. तेथील अडचणींचा विचार करून पुढे वृक्ष लागवड मोहीम अधिक जोपासावी, वाढवावी. यासाठी समाजातील सर्व घटकांची मदत घेणार असल्याचेही त्यांनी या बैठकीत सांगितले.